कामगार विभाग
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

कल्याण आयुक्तांचे कार्यालय,
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
प्रभादेवी स्टेशनजवळ, मुंबई ४०००१३

## जाहीर सूचना

➢ **महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६बब नुसार**

कारखाने अधिनियम,१९४८/ महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम,१९४८/ मोटार वाहतूक कामगार अधिनियम,१९६१/ लघुउद्योग प्रमाणपत्र / केंद्रीय आणि राज्य शासनाद्वारे वितरीत कंत्राट परवाने, जिथे ५ अथवा ५ पेक्षा अधिक कामगार / कर्मचारी काम करतात अशी सर्व दुकाने, आस्थापना, संस्था व कारखाने या अधिनियमाच्या अधीन आहेत. उपरोक्त कारखाने, दुकाने, आस्थापना यांच्या व्यवस्थापनांनी जून कालावधीकरिता १५ जुलै व डिसेंबर कालावधीकरिता १५ जानेवारी पूर्वी कामगार व मालक वर्गणीचा भरणा करणे कायद्याने बंधनकारक आहे.

➢ **महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या नियम क्रमांक ३ नुसार**

१. कामगारांकडून प्राप्त केलेली दंडाची रक्कम

२. कामगारांना देय असलेली तथा ३ वर्षाच्या कालावधीतील मालक / नियोक्ता यांनी अदा न केलेली अवितरित संचयन (वेतन, मजुरी, बोनस, उपदान) रक्कम अधिनियम १९५३ च्या अंतर्गत येणाऱ्या सर्व मालक / नियोक्तांनी व व्यवस्थापनांनी दर ३ महिन्यांनी (मार्च, जून, सप्टेंबर, डिसेंबर) C–फॉर्मद्वारे Rule २१ अन्वये तपशिलासह महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास भरणा करणे कायद्याने बंधनकारक आहे

आपणास कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने व्यवसाय सुलाभीकरणांतर्गत कामगार कल्याण निधी भरणा करण्यासाठी ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे कामगार– मालक वर्गणीचा भरणा करणे सोपे व सोईचे होण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाचे संकेतस्थळ/वेबपोर्टल **(https://public.mlwb.in)** तयार केले आहे. त्यामुळे सदर संकेतस्थळाद्वारे महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या तरतुदीच्या कलम ६बब अन्वये राज्यातील सर्व आस्थापना डिसेंबर २०१९ च्या कालावधीपासूनचा कामगार– मालक वर्गणी भरणा, ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे १ जानेवारी २०२० पासून करू शकणार आहेत. सर्व आस्थापनांना याकरिता सदर संकेतस्थळावर प्रथम (एकदाच) नोंदणी करुन कामगार–मालक वर्गणीचे तपशील देऊन भरणा करणे आवश्यक आहे. सुरक्षित पेमेंट गेटवेच्या सुविधेचा वापर करुन डेबिट कार्ड / क्रेडिट कार्ड / नेट बँकिंग / पेमेंट ॲप्स / एन.ई.एफ.टी. / आर.टी.जी.एस. वगैरेच्या माध्यमातून भरणा करता येणे शक्य होणार आहे.

**दिनांक ०१.०१.२०२० पासून संगणकीय ऑनलाईन प्रणाली कार्यान्वीत होत आहे.**

### ऑनलाईन कार्यपद्धतीचे टप्पे पुढीलप्रमाणे

मंडळाकडे पुर्वीपासून नोंदित आस्थापनांनी आपला कोड नंबर तसेच महाराष्ट्र कामगार कल्याण निधी भरणा केल्याची मागील कोणतीही पावती व दिनांक याची नोंद मंडळाच्या वेबपोर्टलवर करावी. त्यानंतर खालील कार्यपद्धतीचा अवलंब करुन महाराष्ट्र कामगार कल्याण निधीचा भरणा करावा.

| | | |
|---|---|---|
| १. नियोक्ता नोंदणी | २. पॅन क्र. आवश्यक | ३. नियोक्ता संगणकीय प्रणाली वापराकरिता आय.डी व पासवर्ड तयार करणे |
| ४. संगणकीय प्रणालीकरिता नियोक्ता आय.डी व पासवर्डचा वापर | ५. पॅन/ टॅन/टिनचा वापर करुन आस्थापना नोंदणी करणे | ६. आस्थापना संगणकीय प्रणाली वापराकरिता आय.डी व पासवर्ड तयार करणे |
| ७. संगणकीय प्रणालीकरिता आस्थापना आय.डी व पासवर्डचा वापर | ८. कामगार/कर्मचारी यांचे तपशील उदा. नाव, भ्रमणध्वनी क्र. इत्यादीची नोंद करणे | ९. चलन करुन कामगार कल्याण निधी ऑनलाईन भरणा करणे |

अधिक माहितीसाठी
दुरध्वनी क्र. ०२२–४३२२६८१८/ ४३२२६८११/४३२२६८३०
**E-mail : mlwbcomputer@gmail.com,**
**conteeg.mlwb-mh@gov.in**

स्वाक्षरी/–
**महेंद्र रघुनाथ तायडे**
**प्रभारी कल्याण आयुक्त**

**संकेतस्थळ/वेबपोर्टल (https://public.mlwb.in)**

Department of Labour
Government of Maharashtra

# MAHARASHTRA LABOUR WELFARE BOARD

**Office of The Welfare Commissioner**
**Hutatma Babu Genu Mumbai Girani Kamgar Krida Bhawan,**
**Senapati Bapat Marg, Near Prabhadevi Station, Mumbai-13**

## PUBLIC NOTICE

➢ **Under section 6BB of Maharashtra Labour Welfare Fund Act,1953**

Under Factory Act, 1948 / Maharashtra Shops and Establishment Act.1948 / Motor Transport Workers Act, 1961 Small Scale Industries Regulation Certificate / Contract Licenses issued by Central and State Governments, where 5 or more than 5 workers are working, are liable to pay contribution. All shops, Establishments, Institutions and Factories are covered under the said Act. It is mandatory for management of the above said factories, shops, establishments to pay the employer's and employees' contributions before 15th July for the period of June and before 15th January for the period of December.

➢ **Under Section on 3 of Maharashtra Labour Welfare Fund Act, 1953**

1. All fines realized from the employees.
2. All unpaid accumulations (i.e. Salary, Wages, Bonus, Gratuity) due to the employees but not made to them within the period of 3 years from the date on which they became due should be paid by all employers and managements under Maharashtra Labour Welfare Fund Act, 1953 with all relevant details for quarter ending (March, June, September, December)

We are glad to inform you that Maharashtra Labour Welfare Board is initiating an important step for the "Ease of Doing Business" by introducing "ONLINE PAYMENT PORTAL" for payment of Maharashtra Labour Welfare Fund (MLWF) online without much efforts. The MLWB could be paid online through our portal from 1st January 2020 onwards. We have developed our own portal **https://public.mlwb.in** All establishments can get themselves enrolled on the portal (one time process) and can pay the MLWF online using their credentials which will be generated on the portal during registration and through secured payment gateway using Debit Cards / Net banking / Payment Apps / NEFT / RTGS etc.

**The System will Go LIVE From 01.01.2020 onwards**

### For Online Payment process the steps are as follows

Establishment already Enrolled & Paying MLWF, should provide their Establishment code along with the any payment of MLWF Receipt No. & Receipt date on Board's Portal. Then only they can pay the MLWF as per the process given below.

| | | |
|---|---|---|
| **1.Enroll as Employer** | 2.PAN no. compulsory | 3.Create Employer User ID & Password |
| **4.Login using Employer User ID & Password** | 5.Enroll your Establishment using establishment PAN/TAN/TIN | 6.Generate Establishment User ID & Password |
| **7.Establishment Login using User ID & Password** | 8.Enter Labour Details like Name, mobile no. etc | 9.Generate Challan (ECR) & Pay Welfare Fund Online |

For any query, please contact
022-43226807 / 43226811 / 43226818 / 43226830
E-mail : **mlwbcomputer@gmail.com,**
**conteeg.mlwb-mh@gov.in**

Sd/-
Mahendra Raghunath Tayade
**I/c Welfare Commissioner**

**Log on to https://public.mlwb.in**